# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
ईमेल/ Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
Website: www.unipune.ac.in


## परिपत्रक

**विषय : विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त संशोधन केंद्रामधील पीएच्.डी. विद्यार्थ्यांना येणाऱ्या प्रशासकीय व तांत्रिक अडचणी/समस्यांबाबत मा. अधिष्ठाता यांचे अध्यक्षतेखाली जिल्हानिहाय शिबीर आयोजित करून समस्यांचे निराकरण करणेबाबत...**

विद्यापीठ परिपत्रक क्र. शै.प्रवेश/२१०१ दिनांक २५ एप्रिल, २०२६ अन्वये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त संशोधन केंद्रामधील मार्गदर्शक व संशोधक विद्यार्थ्यांना प्रवेश, संशोधक विद्यार्थ्यांना सेवानिवृत्त/राजीनामा, इ. कारणामुळे संशोधन मार्गदर्शक उपलब्ध नसणे, संशोधन कार्यपद्धती, पीएच्.डी ट्रॅकिंगमधील तांत्रिक समस्या, कोर्सवर्क, शुल्क यासारख्या अडचणीं निरसित करण्यासाठी मा. अधिष्ठाता यांचे अध्यक्षतेखाली माहे मे, २०२६ च्या पहिल्या १५ दिवसांमध्ये जिल्हानिहाय शिबीर आयोजित करण्यात येणार आहेत व त्याची माहिती आपल्या संशोधन केंद्राच्या लॉगीनमधून दिनांक ३० एप्रिल, २०२६ पर्यंत भरण्याबाबत कळविण्यात आले होते.

त्याअनुषंगाने मा. विभागप्रमुख/मा.प्राचार्य/संचालक, सर्व विद्यापीठ विभाग/सर्व मान्यताप्राप्त संशोधन केंद्रे यांना कळविण्यात येते की, प्राप्त अडचणी/समस्यांचे निराकरण करण्यासाठी जिल्हानिहाय शिबीरांचे आयोजन खालीलप्रमाणे करण्यात आले आहे.

| अ. क्र. | जिल्हा | दिनांक | ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | पुणे शहर/ग्रामीण | वार शनिवार<br>दि. ०९ मे, २०२६<br>वेळ: सकाळी ११.०० वा. | प्राग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे मॉडर्न महाविद्यालय, गणेशखिंड, पुणे |
| २. | अहिल्यानगर | वार सोमवार<br>दि. ११ मे, २०२६<br>वेळ: सकाळी ११.०० वा. | न्यु आर्टस, कॉमर्स, सायन्स महाविद्यालय, लाल टाकी रोड, अहिल्यानगर |
| ३. | नाशिक | वार मंगळवार<br>दि. १२ मे, २०२६<br>वेळ: सकाळी ११.०० वा. | मराठा विद्या प्रसारक समाजाचे आय.एम.आर.टी., के.टी.एच.एम. महाविद्यालय परिसर, नाशिक |

सदर शिबीरांकरिता ज्या संशोधन केंद्रानी त्यांचेकडील विद्यार्थ्यांच्या अडचणी/समस्यांची माहिती त्यांच्या लॉगीनमधून भरली आहे, अशा संशोधन केंद्रातील संशोधन केंद्रप्रमुख व प्राधिकृत केंद्र समन्वयक यांनी शिबीराच्या ठिकाणी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे. **तसेच संशोधन केंद्रामार्फत संशोधन मार्गदर्शक किंवा संशोधक विद्यार्थ्यांना शिबीराच्या ठिकाणी पाठवू नये.**

गणेशखिंड, पुणे )
संदर्भ : शै. प्रवेश/२२४३ )
दिनांक : ०७.०५.२०२६ )

(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव

**प्रत:**

१. मा. विभागप्रमुख, सर्व विद्यापीठ शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
२. मा. प्राचार्य/संचालक, मान्यताप्राप्त संशोधन केंद्रे, प्रस्तुत विद्यापीठ.

D:\Workshop\2026\Circular.docx